<u>सं. फौ. ख. क्र.३०/२०१५</u> निशाणी १०८

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.१० यांचा जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – प्रल्हाद किसनराव काटकर

वय – ६० वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक बुलढाणा शहर पो.स्टे

पत्ता – सिव्हील लाईन वाशिम, ता.जि.वाशिम.

**<u>सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर.लोखंडे यांचे मार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी दिनांक २४.११.२०१४ रोजी मी उरळ पोलीस स्टेशन येथे ठाणेदार या पदावर कार्यरत होते. मी हजर असतांना माझ्याकडे अपराध क्र ३०५१/२०१४ चा तपास माझ्याकडे सुपूर्द झाला. सदर गुन्हायाचा प्राथमिक तपास उप.पो.अधि. गणेश गावडे यांनी केला. माझ्याकडे तपास आल्यानंतर गुन्हयातील चारही आरोपीना अटक केली. जप्त केलेला मुदेदमाल सि.ए.तपासणीकरिता पाठविण्यात आला. मी सि.ए.तपासणिकरिता पाठविलेले पत्र आता मला दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास आता **निशाणी क्र १०९** देण्यात येते. सि.ए.तपासणीकरिता मी वाहक म्हणून पो.कॉ.राजेंद्र अहेरकर यांना डयुटी पास दिला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास आता **निशाणी क्र ११०** देण्यात येते. त्यानंतर मी जप्त डिझेल ची विल्हेवाट लावण्यासंबधी जिल्हाधिकारी अकोला यांना पत्र दिले. सदरचे पत्र आता मला दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास आता **निशाणी क्र १११** देण्यात येते. त्यानंतर मी सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र अकोला यांना जप्त केलेले टँकर आणि जमिनीत गाडलेल्या लोखंडी टाकीतील डिझेलचे मोजमाप करुन मिळणेकरिता पत्र दिले. सदरचे पत्र आता मला दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास आता **निशाणी क्र ११२** देण्यात येते. त्यानुसार संबंधित विभागातील अधिकारी मोजमाप करुन त्याचा अहवाल दिला. सदर अहवाल आता मला दाखविण्यात आले. तो तोच आहे. त्यावर स्विकृत केल्याची माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास आता **निशाणी क्र ११३** देण्यात येते. तपासादरम्यान आरोपीकडून जप्त केलेल्या सर्व वस्तू व मुदेदमालची यादी मी दोषारोपपत्रासोबत दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास आता **निशाणी क्र ११४** देण्यात येते. त्यानंतर मी साक्षीदारांचे

जाब जबाब नोंदविले आणि आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांचे विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. मला सि.ए.तपासणी अहवाल दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यास **निशाणी क्र ११५** देण्यात येते. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकेल.

सरतपास पूर्ण

**<u>उलटतपास आरोपी १ ते ३ तर्फे विधीज्ञ श्री. एन.एम.अग्रवाल यांचे मार्फत</u>**

२. मला बॅरेजची भौगोलिक माहिती आहे. बॅरेज पासून पाच ते सहा किलोमीटर अंतरावर अमोल साबळे यांचे श्रीकृपा पेट्रोलपंप आहे. तेल्हरा रस्त्यावर निंबा फाटयावर बॅरेजपासून सात ते आठ किलोमीटर अंतरावर अग्रवाल यांचे पेट्रोलपंप होते. त्याठिकाणी बेकायदेशीररित्या काही इसम डिझेल उतरवित आहे, अशी माहिती मिळाली.

प्रश्न – सदर माहितीची नोंद तुम्ही स्टेशन डायरी मध्ये घेतली का ?

उत्तर – गुप्त माहितीची नोंद स्टेशन डायरी मध्ये घेण्याची आवश्यकता नाही.

३. सदर गुप्त माहितीची नोंद घेवून मी त्याचे पाकीट बनवून पोलीस स्टेशनमध्ये ठेवले नाही.

प्रश्न – तुमच्या मते आरोपी बेकायदेशीर डिझेल उतरवित आहे असे माहिती मिळाल्यावर त्यांनी कोणता गुन्हा केला असेल ?

उत्तर – भा.दं.वी. आणि जीवनावश्यक वस्तू कायदा अंतर्गत गुन्हा केला.

४. मला गुप्त माहिती किती वाजता मिळाली हे मला आठवत नाही. माहिती मिळाल्यांनतर आरोपीने केलेले कृत्य धोकादायक आहे कि बेकायदेशीर आहे त्याची प्राथमिक चौकशी केली आणि वरिष्ठाना माहिती दिली. मी माहिती मिळाल्याबरोबर मोक्यावर गेलो होतो. डिझेल टॅंकर कोणाच्या मालकीचे आहे त्याची चौकशी मी केली नाही. जमीनीत गाडलेल्या टाकीचे मालकीचे कागदपत्रे मी प्राप्त केले नाही आणि टाकीचे मालक कोण आहेत त्याची शहानिशा केली नाही.

प्रश्न – पेट्रोलीयम ऍक्ट प्रमाणे तुम्हाला डिझेल व पेट्रोल साठवणूकीचे, वाहतूकीचे आणि रिसेप्टेकल मध्ये जमा करण्याचे अधिकार आहे का ?

उत्तर – उप.पो.अधि. यांच्या आदेशाने आरोपींवर कारवाई करण्यात आली.

५. उप.पो.अधि. यांना डिझेल व पेट्रोल साठवणूकीचे, वाहतूकीचे आणि रिसेप्टेकल मध्ये जमा करण्याचे अधिकार होते किंवा नाही त्याबददल मी चौकशी केली नाही. चौकशी करण्यापूर्वी मी पेट्रोलीयम अक्ट तरतुदीनुसार उप.पो.अधि.यांना अधिकार होते किंवा नाही यांची शहानिशा मी केली नाही. पेट्रोल व डिझेल वाहतुक, साठवणूक आणि सॅप्ललींग

इत्यादी चे अधिकार कोणाला आहे त्याची मी पेट्रोलीयम ॲक्टच्या तरतुदीप्रमाणे चौकशी केली नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की, पेट्रोलीयम ॲक्टच्या तरतुदीप्रमाणे ज्या ट्रक टॅकरला वाहतूकीची परवानगी आहे ते वाहतूक करु शकतात. त्याचप्रमाणे ज्यांना पेट्रोल डिझेलच्या साठवणूकीचा परवाना आहे ते पेट्रोल व डिझेल साठवू शकता. अर्धवट गाडलेल्या टाकीच्या परवानविषयी मी चौकशी केली होती. ट्रक टॅंकरच्या मालकाला पत्र देवून त्याच्या परवानविषयी चौकशी केली नाही. अर्धवट गाडलेल्या टाकीच्या मालकाकडे पत्र देवून परवानविषयी मी चौकशी केली नाही. मी एक्सप्लोझीव विभागाकडे वाहतूकीच्या परवान्याची चौकशी केली नाही. अर्धवट गाडलेल्या टाकीत डिझेल साठवणुकीची परवानगी एक्सप्लोझीव विभागाकडून घेतली किंवा नाही याची चौकशी मी केली नाही. ट्रक टॅकरने गायगाव डिपोतून पेट्रोल आणि डिझेल आणले होते. हे म्हणणे खरे आहे की, गायगाव डेपोकडून ज्या पेट्रोलीयम कंपनी यांना परवाना आहे त्यांनाच पेट्रोल व डिझेल दिले जाते.

७. सन २०१४ मध्ये डिझेलचे रेशनिंग होते किंवा नाही, मला आठवत नाही. सन २०१४ मध्ये डिझेलकरिता काय तरतुदी होत्या ते मी पाहिल्या नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१४ मध्ये आरोपी यांनी डिझेल उतरवून बेकायदेशीर साठवणूक केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की घटनेच्या दिवशी अमोल साबळे माझेसोबत होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशी अमोल साबळे घटनास्थळावर हजर होते. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, ते पंच म्हणून हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, अमोल साबळे ने मला बॅरेजवाले माझ्या पेट्रोलपंपावरुन पेट्रोल न घेता निंबा फाटयावरील पेट्रोलपंपावरुन पेट्रोल घेतात म्हणून त्यांना फसवायचे आहे असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही, त्यामुळे मी, श्री गावडे आणि अमोल साबळे यांनी संगनमत करुन निंबा फाटयावरील पेट्रोलपंच्या टॅंकरचालकाविरुध्द खोटी केस केली. हे म्हणणे खरे आहे की, अमोल साबळे वगळता १७ साक्षीदारांपैकी १६ साक्षीदार हे पोलीस स्टेशनचे कर्मचारी होते. साक्षीदार स्वतःहून सांगतात की काही साक्षीदार हे महसूलचे कर्मचारी होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द संपूर्ण खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, कोणतेही कारण नसताना मी टॅंकरमालकाला नुकसान पोहचविले. हे म्हणणे खरे नाही की, कोणताही जीवनावश्यक वस्तू कायदा आणि पेट्रोलीयम ॲक्ट खाली गुन्हा झालेला नसताना मी आरोपीविरुध्द खोटी कारवाई करुन डिझेल व टॅंकर जप्ती करुन जिल्हाधिकारी यांच्याकडे पुढील कारवाई करणेकरिता सुपूर्द केले.

उलटतपास पूर्ण

**<u>उलटतपास आरोपी ४ करिता विधीज्ञ श्री. एस.टी.इंगळे यांचे मार्फत</u>**

८. श्री गावडे यांनी रिपोर्ट दिल्यानंतर मी गायगाव डेपो येथे जावून तेथून किती पेट्रोल व डिझेल गेले त्याबाबत चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी गायगाव डेपो येथे पत्र देवून दस्ताऐवजाची माहिती घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी कवठा बॅरेज येथील कंपनीकडे त्यांना मोक्यावर किती प्रमाणात डिझेल साठवणूकीचे अधिकार आहेत त्याची चौकशी मी केली नाही तसचे त्याबददलचे दस्त प्राप्त करुन घेतले नाही. हे म्हणणे खरे आहे की, श्री गावडे यांनी गाडलेल्या टाकीतील डिझेलचे मोजमाज कोणत्या साधनाने केले याबददल विचारणा केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, नमुने घेण्यासाठी बाटल्या कोणी व कुठून आणल्या त्याबाबत मी श्री गावडे यांच्याकडे चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी श्री गावडे यांचेकडे चौकशी करुन बयान नोंदविले नाही.

प्रश्न – केंद्रशासनाने तुम्हाला पेट्रोल डिझेलबाबत कारवाई करण्याचे कोणतेही अधिकार दिले नव्हते ?

उत्तर – त्याबाबत मला माहिती नाही.

हे म्हणणे खरे नाही की, मी माझे सरतपासात सांगतो त्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की,मी खोटा रिपोर्ट वरुन आरोपीविरुध्द खोटी कारवाई करुन खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. (**आरोपी क्र. १ ते ३ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास आरोपी क्र ४ तर्फे विधीज्ञ श्री. एस.टी.इंगळे यांनी स्वीकृत केला.** )

फेरतपास नाही. श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2026.03.09 11:49:57 +0530

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर

बाळापूर.
दि.०६/०३/२०२६